सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नामंजूर/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ११६ ठ. क्र. १५० दि. ३०/८/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



एक दिवसीय (दैनंदिन) प्रवास पासचे तिकीटाचे रक्कमेत वाढ करणेबाबत परिवहन उपक्रमाचे उत्पन्नात वाढ व्हावी या उद्देशाने कोणत्याही बसने कोठेही फिरा ही संकल्पना राबवून शहर हद्दीतील प्रवासाकरिता रु. ४०/- व शहर हद्दीसह ग्रामीण भागात प्रवासाकरिता रु. ८०/- इतकी रक्कम आकारणी करुन दैनंदिन (एकदिवसीय) पासेस वितरीत करणेत येत होते. परंतू दि. १६-५-२०१८ पासून तिकीट दरात ८% वाढ करणेत आली असल्याने कोणत्याही बसने कोठेही फिरा या संकल्पनेवर शहर हद्दीतील प्रवासाकरिता रु. ५०/- (अक्षरी रु. पन्नास फक्त) व शहर हद्दीसह ग्रामीण भागात प्रवासाकरिता रु. १००/- (अक्षरी रु. शंभर फक्त) पथकर वगळून म्हणजेच प्रवास करते वेळेस प्रवासाचे अंतरानुसार रोखीने पथकर आकारणी करणे, याप्रमाणे रक्कम आकारणी करुन अंमलबजावणी करणेस मान्यता मिळणेकामी मा. परिवहन समितीचे शिफारसीने मा. सर्वसाधारण सभा, सो.म.पा. यांचेकडे मान्यतेस्तव सादर करणेस मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दि. २-७-२०१८ चे टिपणीप्रमाणे मा. सर्वसाधारण सभेकडे शिफारस करणेस्तव मा. परिवहन समिती ठराव क्र. १२, दिनांक ३०-७-१८ चे शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(signature)

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र.ज. [illegible] प्र.ठ. क्र......951
दि...३०/८/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर महानगरपालिकाच्या टि.पी.२ फा.प्लॉ १०३ जे भवानी पेठ या जागेवर राबविणेत आलेल्या बी.ओ.टी. योजनेस अनुसरुन स्पष्ट अभिप्राय सह संपूर्ण मूळ प्रकरणाची नस्ती जोडून प्रकरण मा.सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेस अनुसरुन मा.सर्वसाधारण ठराव क्र. ३५ ने दि.१७/०४/२०१८ ने निर्णय झाले आहे त्यास अनुसरुन मा.आयुक्त यांचे दि.२४/०५/२०१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सध्या तेथे असलेले गाळेधारक व मुळ गाळेधारक यांची नावे देणेत यावी तेथे किती गाळे बांधण्यास परवानगी देणेत आली होती. सदर ठिकाणी किती गाळे बांधण्यात आले त्या जागेचे ले-आऊटसह माहिती द्यावी. जे गाळे बांधणेत आलेले आहेत त्याची लांबी, रुंदी व उंची किती यासह संपूर्ण माहिती देण्यात यावी. सदरचे गाळे हे कोणत्या व्यवसायासाठी बांधणेत आले होते. सध्या त्या गाळयामध्ये कोणते व्यवसाय चालू आहेत. सध्याचे चालू असलेले व्यवसाय आपल्या नियमावलीप्रमाणेच चालू आहेत काय ? सध्या त्या गाळयांना टॅक्स व भाडे कोणत्या पध्दतीने लावण्यात आले आहेत. आता तेथे नव्याने जी जागा महानगरपालिकेस उपलब्ध होणार आहे त्या जागेवर योजना साकारणेबाबत महानगरपालिकेने निर्णय घ्यावा. या संपूर्ण माहितीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(सही)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/साधारण/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.११८.ठ. क्र....१५२
दि..३०/७/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मनपा वैद्यकीय अधिकारी यांना वेतनश्रेणी ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० ऐवजी मा.शासनाकडील वेतनश्रेणी १५६००-३९१०० ग्रेड पे ५४०० वेतनश्रेणी लागु करण्याबाबतचे तसेच प्रस्तावात नमुद प्रमाणे वैद्यकीय अधिकारी यांना प्रोत्साहनपर वेतन अतिरिक्त वेतनवाढी मंजुर करणेबाबतचे दि.०८/०४/२०१८ रोजीचे मा.आयुक्त यांचे मान्यतेने व आदेशाने आलेल्या प्रकरणास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३५ (अ) नुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.१७-०६-२०१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदर प्रकरणी माहे जुलै २०१८ चे मा. सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या आकृतीबंधाच्या निर्णयामध्ये नमूद केले प्रमाणे कार्यवाही ठेवणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/कामकाजी/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.११६.ठ. क्र.....१५३
दि.३०/८/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



घनकचरा विभागाकरिता प्रस्तावित केलेल्या टिपणीत सर्वात कमी दराचे पुरवठादार प्रगती स्टिल फॅब्रिकेशन अँड फायबर्स यांचेकडून निविदेत दिलेल्या ( १० सीट मोबाईल टॉयलेट व्हॅन) प्रति नग र.रु.७,४९,५००/- याप्रमाणे दोन नग खरेदी करणेस येणा-या खर्चास योग्य त्या रक्कमेचा स्टॅप पेपर करारपत्र करुन वर्क ऑर्डर देणे कामी नियम ३५ (अ) अन्वये मा. आयुक्त यांच्या दि.१०-०२-२०१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/नागरली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.१२०. ठ. क्र......१५८ दि.३०।८।१८...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सो.म.पा.कडील स्त्री सेविकांसाठी साडी, ब्लाऊज पीस व पुरुष सेवकांसाठी कापड खरेदी करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव प्रस्तावात नमूद १) स्त्री सेविका करिता अ.क्र. १ ते ५ मध्ये तपशील खरेदी संख्या व पुरुष सेवक करिता अ.क्र. १ ते ४ मध्ये तपशील, मीटर व खरेदी संख्या नमूद केले असून याकामी अंदाजे र.रु. १०.०० लाख खर्च अपेक्षित आहे. सदरची खरेदी ही शासन अंगीकृत महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादीत यांचेकडून थेट खरेदी करणेची असलेने जाहिरात देणेचा प्रश्न उद्‌भवत नाही. ही बाब विचारात घेता मा. महाराष्ट्र महानगरपालिका कायदा अनुसूची प्रकरण ५ (२) (२) नुसार जाहिर प्रसिध्दीकरण करणेची अट शिथील होणेकामी मा. स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे. सो.म.पा.स्त्री सेविकांसाठी साडी, ब्लाऊज पीस व पुरुष सेवकांसाठी कापड खरेदी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मार्यादित मालेगांव यांचेकडून करणेबाबत मा. स्थायी समिती सभेपुढे प्रकरण पाठविलेले होते परंतू प्रस्तावात नमूद संदर्भीय पत्राने मा. सभापती स्थायी समिती पदाची निवडणूक प्रकिया ही न्यायप्रविष्ठ असल्याने प्रकरण परत पाठविण्यांत आलेले आहे. प्रकरण सो.म.पा.स्त्री सेविकांसाठी साडी, ब्लाऊज पीस व पुरुष सेवकांसाठी कापड खरेदी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मार्यादित मालेगांव यांचेकडून करणेबाबत कलम ३५ (अ) नुसार प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेकडे मंजूरीस्तव ठेवणेकामी मा. उपायुक्त यांचे दि. २९-६-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.



Sd/- PP
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ/१२९ दि.३०/८/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव क्र.......९५५ बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सार्वजनिक आरोग्य अभियंता ड्रेनेज मुख्य कार्यालय व सर्व विभागीय कार्यालयाकडील उपलब्ध असलेले जेटींग मशीन्स दैनंदिन वापरामुळे नादुरुस्त होतात. त्यामुळे सदरचे मशीन्स दुरुस्ती होई पर्यंत एका ठिकाणी बंद अवस्थेत पडून राहतात. त्यामुळे ड्रेनेज लाईन साफ सफाई करण्याचे तक्रारीचे प्रमाण वाढून मा. सदस्य व मा. पदाधिकारी तसेच नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागते. सदर जेटींग मशीन्सचे सुटे स्पेअर पार्टस स्थानिक बाजारात उपलब्ध होत नाही व मशीन्स दुरुस्ती करणारे मेकॅनिकसुध्दा उपलब्ध होत नाहीत. तसेच या जेटींग मशीन्स मागील ७ ते ८ वर्षापूर्वी खरेदी करण्यांत आलेली होती व आजमितीस या मशीन्सचे वॉरंटीचा कालावधी संपुष्टात आलेला आहे.

त्या अनुषंगाने मुळ उत्पादक कंपनी कॅम ॲविडा एन्व्हायरो इंजिनिअररिंग प्रा.लि.पुणे यांना वार्षिक दुरुस्ती करारनामा करणे उचित होत असल्याने कंपनीला याबाबत विचारणा केले असता त्यांनी तयारी दर्शविली आहे. त्यानुसार त्यांचेकडून एका मशीनचे वार्षिक दुरुस्तीचे दर व दैनंदिन वापरामुळे जे स्पेअर पार्टस वारंवार बदलावे लागतात अशा स्पेअर पार्टसचे पुरवठा दर मागविण्यांत आले. मनपाचे आर्थिक हिताच्या दृष्टीकोनातून सदरचे दर कमी करुन मिळणेकामी कंपनीचे प्रतिनिधी समवेत वाटाघाटी करण्यात आली. वाटाघाटीमध्ये मुळ वार्षिक दुरुस्तीच्या दरामध्ये व स्पेअर पार्टसचे मुळ दरामध्ये सरसकट प्रत्येक १८% कमी दराने काम करुन देणेस लेखी सहमती उत्पादक कंपनी कॅम ॲविडा एन्व्हायरो इंजिनिअररिंग प्रा.लि. पुणे यांनी दर्शविली आहे. त्या अनुषंगाने सदरचे जेटींग मशीन्सचे वाटाघाटीत निश्चित झालेल्या कमी केलेल्या दराने जेटींग मशीन्सचे वार्षिक दुरुस्ती करारनामा करणेस, याकामी येणारा खर्च विभागीय कार्यालय व सार्वजनिक विभागाकडील उपलब्ध वाहन दुरुस्ती या सदरी टाकणेस व या प्रकरणी जाहिर प्रसिध्दीकरणाची अट शिथील होऊन मिळणेस, तथापि मा. स्थायी समितीचे सभापती निवडीची बाब न्यायप्रविष्ठ असल्याने सदर प्रकरण मा. सर्वसाधारण सभेची सक्षम मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. १६-६-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सार्वजनिक आरोग्य अभियंता यांनी मशिनरी तपासणी व दुरुस्ती केलेबाबतची खात्री करुन दाखला दिल्यानंतरच संबंधित मक्तेदाराचे बिल अदा करणेत यावे. तसेच ड्रेनेज लाईन कामाचा दैनंदिन देखभाल दुरुस्तीचा कामाचा व्याप विचारात घेता नविन दोन जेटींग मशिन खरेदी करणेबाबत कार्यवाही ठेवावी.

Hcole P.P.
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.नि.२.२.ठ. क्र.......१५६ दि.३०/८/१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



अवमान याचिका क्र.४३/२०१८ वडवान एम.एन.विरुध्द महाराष्ट्र सरकार वगैरे मजरेवाडी नविन सर्व्हे नं.१३२/३अ पैकी या जागेतील ८९६.०० चौ.मी. जागा पाण्याच्या टाकीसाठी भूसंपादनबाबत दिनांक २१/०६/२०१८ रोजी मा.उच्च न्यायालय यांचे आदेश झालेले आहे. या आदेशानुसार वादी श्री. वडवान यांना नुकसान भरपाईची रक्कम रुपये १,३१,०५,१६८/- यामधून यापूर्वी जमा केलेली ३०% रक्कम ३९,३१,५५०/- वजा जाता उर्वरित रक्कम रुपये ९१,७३,६१८/- आदेशाच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत उपजिल्हाधिकारी भूसंपादन क्र.०७ (मोहोळ), सोलापूर यांचेकडे जमा करावे लागणार आहे. या संदर्भात मा.आयुक्त यांच्या दिनांक ०९/०७/२०१८ रोजीच्या आलेल्या प्रकरणाचे अवलोकन करुन अवमान याचिका ४३/२०१८ वडवान एम.एन. विरुध्द महाराष्ट्र सरकार वगैरे मजरेवाडी नविन सर्व्हे नं.१३२/३अ पैकी या जागेतील ८९६.०० चौ.मी.जागा पाण्याच्या टाकीसाठी भूसंपादन करणे या दाव्यामध्ये मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार एकूण १,३१,०५,१६८/- पैकी ३०% रक्कम रुपये ३९,३१,५५०/- इतकी यापूर्वी जमा केलेली आहे. या रक्कमेस कार्योत्तर मान्यता व उर्वरित रक्कम रुपये ९१,७३,६१८/- उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्र.०७ (मोहोळ), सोलापूर यांचे कडे जमा करणेस , सदरहू रक्कम सन २०१८-१९ भांडवली कामे, जागा संपादित करणे, जागा ताब्यात घेणे, या बजेट मधील र.रु.४ कोटी तरतूदी या बजेट सदरीतून खर्ची टाकण्यास मा.आयुक्त यांचे दि.०७/०७/२०१८ टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. ..... दि. ३०/८/१८ .....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव क्र.......१५० बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

सन २०१८-१९ रस्त्यावरील दिवे दुरुस्तीकरिता आवश्यक साहित्य खरेदी करणेकामी दराचे मक्ता निश्चित करुन साहित्य खरेदी करणेबाबत जाहिर प्रसिध्दीकरणाने ई-निविदा मागविल्या असता मे. सूर्या रोषणी लि. यांचे अधिकृत विक्रेते मे. बागडी एजन्सी यांचे एकमेव निविदा प्राप्त असून, दि. २०-६-२०१८ रोजी मा. आयुक्त यांचे समवेत, वाटाघाटी अंती मंजूर झालेल्या दराने र.रु. ३७,५०,८३०/- इतक्या रक्कमेचे साहित्य खरेदी करणेस, मा. स्थायी समिती सभापती निवड न्यायालयीन केसमुळे मा. स्थायी सभेचे कामकाज सुरु नसल्याने प्रस्ताव मंजूरीसाठी MMC Act Sect. ३५ (A) प्रमाणे मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ७-७-२०१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

१२३

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

अकोला महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१२४ दि. ३०.८.१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव क्र......१५८ बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

मा.क्र - १४६४३
दि. - १०/०८/२०१८

१२४

१३ वे वित्त आयोगातून खरेदी करण्यात आलेल्या कैलास रथ व ट्रॅक्टर चलित मिनी बॅकहो लोडर मशिन दर आकारणीबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव १३ वे वित्त आयोगातून खरेदी करण्यात आलेल्या कैलास रथ व ट्रॅक्टर चलित मिनी बॅक हो लोडर मशिन करिता शहर हद्दीत कैलास रथ करिता रु. ४००/- व खोदाई करिता ट्रॅक्टर चलित मिनी बॅक हो लोडर मशिन करिता रु. ३००/- याप्रमाणे व शहर हद्दीबाहेर प्रति कि.मी. रु. ८/- येता-जाता याप्रमाणे दर आकारणी करणेस मा. आयुक्त यांचे दि. १६-६-२०१८ व दि. १०-७-२०१८ चे टिपणीप्रमाणे आलेल्या प्रस्तावास मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी सदरचा विषय तातडीची बाब म्हणून दि. १६-७-२०१८ च्या मा. स.सा. समोर मान्यतेसाठी सादर करणेस्तव मा. आयुक्त यांचे दिनांक १०-७-२०१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

१३ वे वित्त आयोगातून खरेदी करण्यात आलेल्या कैलास रथ व ट्रॅक्टर चलित मिनी बॅक हो लोडर मशिन अंत्यविधीसाठी मोफत देणेस मान्यता देणेत येत आहे. शहर हद्दीबाहेर प्रति कि.मी. रु. ८/- येता-जाता याप्रमाणे दर आकारणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
अकोला महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/कामकाज/विशेष सर्वसाधारण सभेपुढे विषय क्र. अ/१२५ ठ. क्र. ......१५९ दि. ३०।८।१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त होऊन नागरी सेवेत पुनर्नियुक्त होणा-या कर्मचा-याची सुधारीत वेतनश्रेणीत वेतन निश्चिती करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव व प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे अग्निशामक दलाकडील दोन फायरमन सेवक १) श्री. जगताप संजय चांगदेव २) श्री. वाघमारे क्नुरसिध्द भिमशा हे माजी सैनिक असल्याने त्यांना महाराष्ट्र शासनाच्या दि. ११ जुलै २०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार सुधारीत वेतनश्रेणीमध्ये वेतननिश्चिती करणेकामी नियमानुसार प्रस्तावात नमूद संदर्भ क्र. १ अन्वये मा. स्थायी समितीची मान्यता घेण्यास्तव प्रस्तावित करणेत आले होते. सदर प्रस्तावावर माननियांनी दि. ११-७-२०१२ चे शा.नि.प्रमाणे प्रस्ताव मान्य करणेस हरकत नाही असे आदेश दिले असल्याने प्रकरण मा. नगरसचिव कार्यालयाकडे संदर्भ क्र. २ अन्वये पाठविले असता संदर्भ क्र. ३ अन्वये आजला मा. सभापती स्थायी समिती पदाची निवडणूक प्रक्रिया ही न्याय प्रविष्ठ असल्याने सदरचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेपुढे निर्णयाकामी सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३०-६-१८ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदर सेवकांची नेमणूक झाल्यापासून आजतागायत कोणकोणती कार्यवाही करणेत आली या संपूर्ण मुळ नस्तीसह प्रकरण फेर सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

(signature) [illegible]

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/खास/विशेष एवं साधारण सभेपुढे विषय क्र. ...१२६... दि. २०/८/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ठ. क्र. ....९५० बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

मा.क्र. - 22425
दि. - 10/09/2018

१२६

सोलापूर महानगरपालिकेकडे आज रोजी कार्यरत असलेले मे. म्युनिसिपल न्यायालय हे मा. जिल्हा न्यायालयात वर्ग करणेबाबत तत्कालीन मा. आयुक्त यांनी प्रकरणी मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश यांचे पत्रास विनंती पूर्वक कळविले होते. तसेच म्युनिसिपल कोर्टात महानगरपालिकेचे दाखल होणारे केसेस अत्यंत कमी प्रमाणात आहे. त्यामुळे तेथील सेवक वर्गास महानगरपालिकेचे पुरेसे काम दिसून येत नाही व न्यायालयीन दंडापासून जमा होणारी रक्कम अत्यंत अल्प असून त्यावर महानगरपालिकेचा होणारा खर्च मात्र जास्त आहे. तत्कालीन मा. आयुक्त यांनी सदरहू आजला सोलापूर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती खालावलेली असून अधिकारी/कर्मचारी यांचे वेतनावर तसेच सेवानिवृत्त कर्मचारी यांचे निवृत्ती वेतनावर खर्च करणे देखील महानगरपालिकेस सध्या कठीण जात आहे. त्यामुळे मे. म्युनिसिपल कोर्ट मे. जिल्हा न्यायालय मध्ये वर्ग करणेचे आहे असे कळविले होते. तरी मे. म्युनिसिपल कोर्टाचे थकीत रक्कम माहे जून २०१८ अखेर रक्कम रु. ४,२३,९८,३५२/- इतकी रक्कम मे. जिल्हा न्यायालयाकडे सोलापूर महानगरपालिकेस देणेची आहे. तरी उक्त अधिनियमानुसार स्थापन करण्यात आलेले मे. म्युनिसिपल न्यायालय याची आजला सोलापूर महानगरपालिकेस आवश्यकता नाही. तसेच सोलापूर महानगरपालिके मार्फत दाखल करण्यात येणा-या केसेस आजला पॅनल ॲडव्होकेट यांचे मार्फत मे. जिल्हा न्यायालयात दाखल करता येतात. त्यामुळे मे. म्युनिसिपल न्यायालय बंद करणेकामी मा.म.न.पा.ची मान्यता घेणे तसेच सदर न्यायालय बंद करणेकामी मा. शासन व मा. जिल्हा न्यायालय, मा. उच्च न्यायालय, मा. मंत्रालय यांचेशी पत्र व्यवहार करणेबाबत संपूर्ण अधिकार मा. आयुक्त यांना सूपूर्त करणेकामी मा. आयुक्त यांचे दिनांक २२-६-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणंत येत आहे.

मा. तत्कालीन आयुक्त दि. ३१-१-२०१४ रोजी सदर म्युनिसिपल न्यायालय हे कामकाज कमी असल्याने जिल्हा न्यायालयाकडे बंद करण्याबाबत पत्र दिलेले होते. परंतू त्यानंतर चार वर्ष ही प्रक्रिया विधान सल्लागार यांनी प्रलंबित ठेवल्याने एका वर्षाचे अडीच कोटी प्रमाणे चार वर्षाचे दहा कोटी रुपये म.न.पा.स आर्थिक भूर्दंड बसलेला आहे. ज्या ज्या कर्मचा-यांनी कामात कुचराई केलेली आहे अशा कर्मचा-यांवर आर्थिक नुकसानीस जबाबदार धरुन कार्यवाही करणेस ही सभा मान्यता देत आहे.

(सही)
नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/चालू/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१२/८ ठ. क्र.......२६९
दि.३०/८/१८.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



मा. केंद्र शासनाच्या आवास व शहरी कामकाज मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. २९-६-२०१८ च्या पत्रामध्ये मा. पंतप्रधान, भारत सरकार यांनी दिलेल्या सूचनानुसार दि. १-७-२०१८ पासून भारतातील सर्व स्मार्ट शहरामध्ये देयकांचे संकलन तथा अदा होणा-या देयकांचे डिजीटायझेशन करणेकामी मा. महाराष्ट्र शासनाने क्र. शिकाना स्मार्ट सि. २०१८/प्र.क्र.०८/नवि-३३, दि. ९-७-२०१८ च्या पत्रानुसार १०० दिवसाचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. त्यानुसार आवश्यक त्या सूचना पत्रामध्ये दिलेल्या आहेत.

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत कर आकारणी कर संकलन कार्यालय व शहर हद्दवाढ विभागाकडे मिळकत कराची वसुली हस्तलिखीत पावत्या हया बंद करण्यात आलेल्या असल्यामुळे कोणत्याही वसुली सेवकांकडून रक्कम रोखीने स्विकारण्यात येत नाही. त्यामुळे आनलाईन व नागरी सुविधा केंद्रकाकडील संगणकाद्वारे आजला मिळकत कराची रक्कम, हस्तांतरण फी, वारस नोंद फी, नवीन नोंदणी फी ही स्विकारण्यांत येते. शासनाच्या निर्देशानुसार शुल्क डिजिटल ट्रान्झक्शन अंतर्गत RTGS, NEFT, Credit Card, Debit Card व P.P.I. ऑनलाईनद्वारे रक्कम थेट महानगरपालिकेच्या खात्यावर जमा होणार असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही चालू करण्यात आलेली आहे.

सन २०१८/२०१९ च्या आर्थिक बिलावर मिळकतदारांना दि. ३१-८-२०१८ अखेर महानगरपालिकेच्या मालमत्ता करावर ५% ची सवलत दिली जात आहे. ऑनलाईन ट्रान्झक्शनद्वारे शुल्क स्विकारल्यास कामाचा निपटाराही जलदगतीने होण्यास मदत होणार आहे. त्यामुळे डिजिटल ट्रान्झक्शन माध्यमातून रक्कम जास्तीत जास्त ऑनलाईन भरण्यासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक असल्याने मिळकतदारांना कॅशलेस व्यवहार करण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने ज्या मालमत्ताधारकांनी डिजीटल पेमेंट ऑनलाईन ट्रान्झक्शनद्वारे करतील अशा मालमत्ताधारकांना महानगरपालिकेच्या मालमत्ता करामध्ये अतिरिक्त १% ची सवलत माहे ३१-१०-२०१८ अखेर देणेबाबत धोरणात्मक निर्णय होणे जरुरीचे असल्याने यांस मा. स्थायी समिती व मा. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता आवश्यक आहे. तथापी आजला मा. स्थायी समितीचे कामकाज बंद असल्याने सदरचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील नियम ३५-अ नुसार मा. महानगरपालिकेकडे मान्यता मिळणेकामी मा. महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. २५-७-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

हस्तलिखीत पावत्याद्वारेही वसुली करण्यांत यावी. झोनवाईज यंत्रणा कार्यान्वीत करणेत यावी. याबाबत डिजीटलायझेशनचे संदर्भात मोठया प्रमाणात जनजागृती करणेत यावी. यासही मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मामुली/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. अ.12.8 ठ. क्र. 162 दि. 30/8/18 रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१२८

सोलापूर शहरातील प्रभाग क्र.११ मधील रहिवाशी श्री सुरज अंबादास चन्ना रा,घर नं.३७६ किसान संकुल येथे राहत असून त्यांना गेल्या दोन महिन्यापूर्वी डेंग्यू झालेला आहे. सद्या त्यांच्यावर उपचार चालू आहे. त्यांची कुटुंबाची आर्थिक परिस्थिती खुप हालाकिचे व खुप गरीब कुटुंबातील व्यक्ती असल्याने त्यांना उपचारासाठी सुध्दा पैसे नसल्याने योग्य तो उपचार करता येत नाही. तरी त्यांना पुढील उपचारासाठी आपल्या सोलापूर महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. १३० ठ. क्र....१६३
दि. ३०/८/१८...रोजी ठेवता खालील मो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

१३०

नगर अभियंता विभागाकडील रस्ते दुरुस्ती कामी लागणारे लूज डांबर २५० मे टन खरेदी करणेकामी सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षापासुन पाच वर्षकरीता आवश्यकते प्रमाणे म्हणजे २०२२-२०२३ वर्ष अखेर पर्यंत व साठवण क्षमतेनुसार रस्ते दुरुस्ती कामी लागणारे लूज डांबर २५०मे टन VG-३० (६०-७०) भारत सरकारच्या अंगीकृत उपक्रम भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम व इंडीयन ऑईल या डांबर उत्पादक कंपन्याकडुन त्या त्या वेळेच्या प्रचलित दराने व रोखीने खरेदी करणेस मा.आयुक्त यांनी दिनांक २५/०५/२०१८ चे मान्यतेने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन होऊन मा.आयुक्त यांचे दिनांक २५/०५/२०१८ चे टिपणी प्रमाणे महानगरपालिका कलम क्र.३५ (अ) नुसार मान्यतेस्तव आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

प्रकरणी रोखीने शब्द वगळून मान्यता देणेत येत आहे. प्रति वर्षाला डांबर खरेदी किती करणेत आली व त्यातून कोणकोणती कामे करण्यांत आली याची माहिती मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करावी.

P.P

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ९३७ ठ. क्र. २६४ दि. ३०/८/१८ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोमपा आरोग्य खातेकरिता १३ वे वित्त आयोगातून मिनी ट्रॅक्टर चलित बॅकहो लोडर मशिन खरेदी करणेकामी ई-निविदा पध्दतीने १ वेळा निविदा प्रसिध्दीकरण केले असता ३ निविदा धारकांनी आपली निविदा भरण्यात आलेली होती १) श्री. माऊली ट्रॅक्टर्स यांचे दर र.रु. १२,९६,०००/- प्रति नग २) अनुराज ट्रॅक्टर्स यांचे दर र.रु. १३,२८,०००/- प्रति नग ३) ओम ट्रॅक्टर्स यांचे दर र.रु. १३,४३,०००/- यांचे असे दर प्राप्त झाले आहेत. यातील श्री. माऊली ट्रॅक्टर्स यांनी सर्वात कमी दर म्हणजे र.रु. १२,९६,०००/- असल्याने श्री. माऊली ट्रॅक्टर्स यांच्याकडून त्यांनी दिलेल्या एस्टीमेट दराने म्हणजे र.रु. १२,९६,०००/- या दराने करुन घेणेस व त्यांना जा.क्र.न.अ.मवि. ३४५, मायनेट क्र. ००५४ दि. १४-३-२०१८ ने दिलेल्या वर्क ऑर्डरची माहिती घेणेबाबत आजला मा. स्थायी समिती सभापती पद निवड न्यायप्रविष्ठ असल्याकारणाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३५ (अ) संविदेची माहिती मा. सर्वसाधारण सभेकडे पाठविणेस मा. आयुक्त यांचे दि. १६-६-१८ चे टिपणी प्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

(सही) P.P.
नगर सचिव
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज.१३२८ क्र. ९६४ दि. ३०।६।१८ रोजी ठेवता झालेले प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

MN/ 13836
10/07/2018

१३२

सोलापूर महानगरपालिकेकडे मक्तेदार नोंदणी प्रमाणे देणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव मक्तेदार श्री.वैभव वसंत होमकर यांनी मक्तेदार नोंदणीकरीता आवश्यक ती कागदपत्रे सादर केले असलेने व ती वर्ग अ-१ करीता योग्य असल्यामुळे त्यांचे वर्ग अ-१ मध्ये नोंदणी करणेस व मान्यतेअंती मक्तेदार श्री.वैभव वसंत होमकर यांचेकडून र.रु.१५,०००/-इतकी नोंदणी फी घेऊन,त्यांना वर्ग ब मध्ये नोंदणी करणेस,व नोंदणी प्रमाणपत्र देणेस,याकामी मक्तेदार नोंदणी करणेस्तव मा.स्थायी समितीची सभा होत नसलेने मक्तेदार यांचे नोंदणी करणेच्या दृष्टीने प्रकरणी सक्षम मान्यता मिळणेकामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३५ अ नुसार मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा.आयुक्त यांचे दि.३०/६/१८चे टिपणीने आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

संबंधित मक्तेदार यांनी यापूर्वी मनपाकडील कोणकोणती कामे केलेली आहेत,तसेच त्यांना कामाचा अनुभव आहे किंवा कसे?त्यांचेकडे जीएसटी क्रमांक आहे किंवा कसे असल्यास त्याचे क्रमांक,त्यांनी आजपर्यंत मनपाकडील प्रा.फंड रक्कम भरलेली आहे काय?याबाबत सविस्तर माहितीसह तसेच महानगरपालिकेने मक्तेदार नोंदणीसाठी वाढीव वर्गवारी व नोंदणी शुल्काबाबतचा सुधारित तक्ता तयार केलेला आहे.सदर सुधारित नियमानुसार वरील मक्तेदाराचे नोंदणीबाबतचे प्रकरण आहे किंवा कसे नसल्यास सदरचा प्रस्ताव दप्तरी दाखल करुन नव्याने सुधारित नियमानुसार नोंदणी प्रमाणपत्र देणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत यावा,यास मान्यता देणेत येत आहे.

P.P.

नगर सचिव

सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ.१३३ ठ. क्र.....१६६ दि.३०।८।१८....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



सोलापूर शहरातील सध्याचे अस्तित्वातील असलेले दिवे काढून त्या ठिकाणी LED दिवे बसविणे व आवश्यकते प्रमाणे नविन पोल उभारणे व त्यावर नविन दिवे बसविणेकामी KENOICS यांच्या नावाने प्रस्तावित केलेली संपूर्ण निविदा प्रक्रिया प्रस्तावात नमूद कारणास्तव रद्द करणेस मान्यता देण्यात येत आहे. व तसेच प्रस्तुत प्रकरणी मा. शासन निर्णय संकीर्ण २०१७/प्र.क्र.१८३/नवि-२०, दि. ४ जून २०१८ नुसार संपूर्ण शहरामध्ये सध्याचे असलेले दिवे काढून LED दिवे बसविणेकामी मा. शासन अंगीकृत कंपनी एनर्जी एफिशिएंसी सर्व्हीस लिमीटेड (EESL) यांचेबरोबर करारपत्र करणेस व त्या अनुषंगीक आवश्यक त्या बाबी बाबत निर्णय घेणेकामी मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करणेस, वर्कऑर्डर देणेस व येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सोलापूर शहर व हद्दवाढ भागामध्ये आवश्यकतेप्रमाणे LED दिवे लावणेकामी लागणारी आवश्यक पायाभूत साधन सामुग्री उभारणी करिता स्वतंत्र पुरवणी करारपत्र EESL यांचे सोबत करणेस व सदरचा खर्च स्मार्ट सिटी निधीतून प्रस्तावित केल्याप्रमाणे करणेस मान्यता देण्यात येत आहे. व सदरकामी कार्यवाही करणे संबंधित अधिकार मा. आयुक्त यांना देण्याबाबत आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

EESL कंपनी मार्फत ज्या शहरामध्ये LED दिवे बसविणेत आले आहेत अशा शहरामध्ये सहा महिन्यापेक्षा जास्त पिरीएड झाला आहे. अशा महानगरपालिकेला सर्व गटनेत्यांची पत्रकारासह व्हीजीट देऊन त्यांचे अनुभव घेऊनच निर्णय घेण्यास ही सभा मान्यता देत आहे. तशा महानगरपालिकेची माहिती व त्यांच्याशी संपर्क साधून मा. आयुक्त यांनी व्हिजीटचे नियोजन करावे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका